असा. क्र. ७८ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जुलै ५, २००७/आषाढ १४, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जुलै २००७

अधिसूचना

मोटार वाहन अधिनियम, १९८८.

क्रमांक एमव्हीआर. ०८०७/प्रक्र -११०/परि-२.—मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम ६५, पोट-कलम (२) खंड (त) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने ज्या महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ यामध्ये आणखी सुधारणा करण्याचे योजिले आहे त्या नियमांचा पुढील मसुदा त्याद्वारे बाधा पोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी

[**किंमत :** रुपये ७.००]

उक्त अधिनियमाच्या कलम २१२, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा असलेली अधिसूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध होईल त्या दिनांकापासून तीस दिवसानंतर महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग (परिवहन व उत्पादन शुल्क), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त कालावधीत येतील त्या शासनाकडून विचारात घेतल्या जातील.

नियमांचा मसूदा

१. या नियमांना महाराष्ट्र मोटार वाहन (पहिली सुधारणा) नियम, २००७ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ याच्या नियम ५६ मधील " दहा किंवा त्याहून कमी वाहनांसंबंधीच्या अशा प्रत्येक प्रतीला " या मजकुराऐवजी " प्रत्येक वाहनासंबंधीच्या अशा प्रत्येक प्रतीला " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ज्यो. मा. चव्हाण,
शासनाचे उप सचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 5th July 2007

NOTIFICATION

MOTOR VEHICLES ACT, 1988.

No. MVR. 0807/CR-110/TRA-2.—The following draft of the rules further to amend the Maharashtra Motor Vechicles Rules, 1989, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (*p*) of sub-section (*2*) of section 65 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), and of all other powers enabling it in this behalf, is hereby published, as required by sub-section (*1*) of section 212 of the said Act, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after thirty days from the date on which this draft Notification is published in the *Maharashtra Government Gazette*.

2. Any objections or suggestions which may be received by the Principal Secretary to the Government of Maharashtra, Home Department (Transport and Excise), Mantralaya, Mumbai 400 032, form any person with respect to the said draft, within the aforesaid period, will be considered by the Government.

DRAFT RULES

1. These rules may be called the Maharashtra Motor Vehicles (First Amendment) Rules, 2007.

2. In rule 56 of the Maharashtra Motor Vehicles Rules, 1989, for the words " For every such copy in respect of ten or less number of vehicles " the words " For every such copy in respect of each vehicle " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. M. CHAVAN,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

E:\21\2007\TRA-2MVR-0807-CR-110-L

तात्काळ/अधिसूचना
कालमर्यादा

क्र. : एमव्हीआर-०८०७/प्र.क्र.११०/परि-२
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक ८ १६ जुलै, २००७.

प्रति,

प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद, नागपूर खंडपीठ.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व उप परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हा दंडाधिकारी.
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त,
सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई.
सर्व पोलीस अधिक्षक.
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी.
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासन अधिकारी (पोल-८), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय : महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८८ च्या नियम ५६ मध्ये सुधारणा करणे.

उक्त विषयाबाबतची प्रारुप अधिसूचना दि.५.७.२००७ शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ मध्ये दि.५.७.२००७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या प्रारुप अधिसूचनेच्या मराठी व इंग्रजी प्रती सोबत पाठविण्यात येत आहे. सदर अधिसुचना जनतेच्या माहितीकरिता कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात यावी व विविध प्रसिध्दी माध्यमांव्दारे अधिसूचनेस प्रसिध्दी देण्यात यावी. सदर प्रारुप अधिसुचनेवर जनतेकडून हरकती व सुचना प्राप्त झाल्यास शासनास त्वरित पाठवाव्यात.

(शहाजहान मुलाणी)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.